# संरक्षणशास्त्र

## इयत्ता अकरावी



संरक्षणशास्त्र इयत्ता अकरावी (मराठी माध्यम)



भारतीय वायुदलाचे
बचाव कार्य




आय एन एस ताबार




वाघा सीमा

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास – २११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी– ४ दिनांक २५.४.२०१६
अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक २०.६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे
पाठ्यपुस्तक सन २०१९– २० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# संरक्षणशास्त्र

## इयत्ता अकरावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे

J8K2K1

आपल्या स्मार्टफोनवर DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक–श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
पुनर्मुद्रण : २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**संरक्षणशास्त्र विषय समिती**

प्रा. डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
ब्रिगेडीअर एस. जी. गोखले (निवृत्त), सदस्य
कर्नल डॉ. प्रमोदन मराठे (निवृत्त), सदस्य
डॉ. विजय जाधव, सदस्य
डॉ. शांताराम बडगुजर, सदस्य
डॉ. अजयकुमार लोळगे, (सदस्य सचिव)

**मुख्य समन्वयक**

श्रीमती प्राची रवींद्र साठे

**नकाशाकार**

श्री. रविकिरण जाधव
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. रमेश माळगे

**अक्षरजुळवणी**

पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. लिलाधर आत्राम
निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**संरक्षणशास्त्र अभ्यास गट**

श्री. नंदकुमार बोरसे
श्री. विवेकानंद कदम
डॉ. संजय ढाके
प्रा. होमसिंग पाटील
श्री. वैजनाथ काळे
डॉ. सोमनाथ राऊत
डॉ. केशव पाटील
श्री. विक्रांत कावळे
प्रा. गिरिश गावित
प्रा. भारतभूषण बालबुद्धे

**संयोजक**

डॉ. अजयकुमार लोळगे
विशेषाधिकारी कार्यानुभव व
प्र. विशेषाधिकारी, आरोग्य व शारीरिक शिक्षण
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**प्रकाशक**

विवेक उत्तम गोसावी
**नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**विद्यार्थी मित्रांनो,**

इयत्ता अकरावीच्या वर्गात तुम्हां सर्वांचे स्वागत आहे. संरक्षणशास्त्र या विषयाचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे.

संरक्षणशास्त्र म्हणजे काय? या विषयाचा अभ्यास आपण का करतो? आपले राष्ट्र सुरक्षित आणि स्वतंत्र राहावे यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांच्या अभ्यासाला पारंपरिकरीत्या संरक्षणशास्त्र असे संबोधले जाते. हे साध्य करण्यात लष्कराचा मोठा वाटा असतो. देशाचे संरक्षण करणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी असते. आज आपण राष्ट्रीय सुरक्षा हा शब्दप्रयोग वापरतो. ह्याला अधिक व्यापक अर्थ आहे, त्यात राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणविषयक तसेच इतर घटकांचा समावेश होतो.

संरक्षणशास्त्राचा अभ्यास भारतीय विद्यापीठांमध्ये १९६० च्या दशकात सुरू झाला. युवकांमध्ये राष्ट्रीय सुरक्षाविषयक जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने या विषयाचे अध्यापन केले जाते.

इयत्ता अकरावीचे पुस्तक हे राष्ट्रीय सुरक्षा या संकल्पनेला केंद्रभूत मानून तयार केले गेले आहे. संरक्षणशास्त्र या विषयाच्या वेगवेगळ्या घटकांचा परिचय यात दिला आहे. यामध्ये राष्ट्रहित आणि राष्ट्रीय सुरक्षा; भूराजनीती; संरक्षण अर्थशास्त्र; लष्करी इतिहास; विज्ञान आणि तंत्रज्ञानांचे कार्य यांचा समावेश केला गेला आहे. या सर्व संकल्पना भारताच्या संदर्भात चर्चिल्या गेले आहेत.

संरक्षणक्षेत्रात करिअर करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या बाबी या पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. त्याचा तुम्हांला निश्चितच उपयोग होईल. पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करताना सुचवलेले उपक्रम शिक्षक आणि पालकांच्या मदतीने पूर्ण करा. याच बरोबर क्यू. आर. कोडचाही वापर करावा.

पाठ्यपुस्तक वाचताना, समजून घेताना, तुम्हांला आवडलेला भाग तसेच अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी, पडणारे प्रश्न आम्हांला जरूर कळवा.

तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा!

**(डॉ. सुनिल मगर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे
दिनांक : २० जून २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ, शके १९४१

# शिक्षकांसाठी

**११ वी संरक्षणशास्त्र अध्यापनाचा दृष्टिकोन :**

संरक्षणशास्त्र हा आंतरविद्याशाखीय विषय आहे. याच्या केंद्रस्थानी राष्ट्रीय सुरक्षा आहे. यात संरक्षणाच्या सर्व पैलूंचा जसे की, लष्कर, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक इत्यादींचा समावेश होतो. म्हणूनच हे सर्व पैलू लक्षात घेऊन या विषयाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

इयत्ता ११वी आणि १२वीकडे एकत्रितपणे पाहिले पाहिजे. इयत्ता ११वीचा अभ्यासक्रम संरक्षणशास्त्राचे विविध पैलू समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो. यात राष्ट्रीय सुरक्षा, भू-राजनीती, लष्कराचा इतिहास, संरक्षणाचे अर्थकारण, विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच भारतातील संरक्षण संघटना या संकल्पनांचा समावेश होतो. भारताची राष्ट्रीय सुरक्षा हा इयत्ता १२वीचा अभ्यासक्रम समजून घेण्यासाठीचा पाया म्हणजे ११वीचा अभ्यासक्रम होय.

**काही महत्त्वाचे पैलू:**

(१) उपक्रमः आकलनाच्या प्रक्रियेत नकाशे महत्त्वाचा भाग आहेत. विशेषतः भू-राजनीती आणि लष्करी इतिहासाच्या पाठांसाठी ते खूपच महत्त्वाचे आहेत.

(२) आकलनः लष्करी इतिहास म्हणजे केवळ घडलेल्या घटनांचा अभ्यास नव्हे, तर त्यातील विविध प्रवाहांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. लष्करी इतिहासाला भू-राजनीतीशी जोडण्यासाठी हे गरजेचे आहे.

(३) विश्लेषणः राष्ट्रीय सुरक्षेत गुंतवल्या जाणाऱ्या रकमेची कारणे समजून न घेता राष्ट्रीय सुरक्षा समजून घेणे शक्य नाही. याकरिता, आपल्याला संरक्षणाचे अर्थकारण समजून घ्यावे लागेल. आपल्याला संरक्षण आणि विकासातील सहसंबंधदेखील अभ्यासावे लागतील कारण संरक्षणावर झालेला सर्व खर्च अनाठायी नसतो.

(४) वर्गातील चर्चाः तंत्रज्ञानात होणाऱ्या जलद बदलांबाबत आपल्याला कल्पना आहेच. मोबाईल (भ्रमणध्वनी), आंतरजाल ही आजची सर्वसाधारणपणे दिसणारी वैशिष्ट्ये आहेत. इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश विज्ञान आणि अणुशक्ती तंत्रज्ञान यांची संरक्षणातील उपयुक्तता काय? हे तंत्रज्ञान नागरिक आणि संरक्षण अशा दोन्हीसाठी कितपत उपयोगी आहेत? अशा काही प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे.

(५) क्षेत्रभेट/मुलाखत/संवादः संरक्षण आस्थापनेला भेट द्या किंवा भारतीय लष्करातील निवृत्त अधिकाऱ्यासोबत संवाद साधा किंवा कोणत्याही महत्त्वाच्या विषयावर व्याख्यान आयोजित करा.

**काही महत्त्वपूर्ण संकेतस्थळेः :**

(i) भारतीय संरक्षण मंत्रालय: https://mod.gov.in/

(ii) भारतीय गृहमंत्रालय: https://mha.gov.in/

(संरक्षण मंत्रालय आणि गृहमंत्रालयाचे वार्षिक अहवाल वरील संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत.)

# विद्यार्थ्यांसाठी

**पुस्तकाविषयी थोडेसे :**

१९६० च्या दशकात भारतातील विद्यापीठांमध्ये 'लष्करी शास्त्र' (Military Science) नावाने विभाग सुरू केले गेले. त्यातील पहिले दोन विभाग हे पुणे व अलाहाबाद येथे सुरू झाले. हा एक शैक्षणिक अध्यापनाचा विषय म्हणून सुरू केला गेला. ह्या विषयाचे स्वरूप आंतरविद्याशाखीय आहे. १९६८ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने डॉ. डी. सी. पावटे यांची समिती नेमली. ह्या विषयाच्या अध्यापनात नॅशनल कॅडेट कोरसारखे लष्करी स्वरूपाचे प्रशिक्षण दिले जाऊ नये असे ह्या समितीने नमूद केले. पुढील काही वर्षांत ह्या विषयाची व्याप्ती वाढवून त्याला जागतिक संदर्भ देण्याच्या दृष्टीने विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) पावले उचलली. ह्या विषयाला शैक्षणिक स्वरूप देण्यासाठी विषयाचे नाव संरक्षणशास्त्र असावे असे ले. जनरल के. पी. कॅन्डेथ समितीने (१९७८) सुचवले. ह्या विषयाला आता स्वतःचे स्वतंत्र स्थान मिळाल्याने आणि जागतिक पातळीवर बदल होत गेल्याने ह्या विषयाचे नाव त्याच्या व्याप्तीला साजेसे होईल असे ठेवण्यात आले. हे कार्य डॉ. मिश्रा समितीने केले आणि ह्या विषयाला आता 'संरक्षण आणि सामरिकशास्त्र' ह्या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यानंतर युजीसीच्या एअर कमोडोर जसजीत सिंह समितीने ह्या विषयाचा रोख हा राष्ट्रीय सुरक्षा असावा असे सुचवले.

आजच्या जागतिक व्यवस्थेत राष्ट्रीय सुरक्षा हा विषय समजून घेण्यासाठी बदलत्या अंतर्गत तसेच जागतिक घडामोडींची जाणीव असणे गरजेचे आहे. ह्या विषयाच्या अभ्यासात लष्कराचे कार्य समजून घेणे जितके गरजेचे आहे, तितकेच खालील इतर घटकांकडेदेखील लक्ष देण्याची गरज आहे.

(१) राजनयाचे कार्य

(२) सुरक्षा हे एक मानवी मूल्य आहे.

(३) लष्करी इतिहास

(४) देशांतर्गत असलेले राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवाह

(५) संरक्षणाचे अर्थकारण

(६) विज्ञान आणि तंत्रज्ञानातील विकास

(७) आंतरराष्ट्रीय कायद्याचे कार्य

संरक्षणशास्त्राचा व्यापक दृष्टिकोन विकसित करण्याच्या दृष्टीने, तसेच भारतीय सुरक्षेवर लक्ष केंद्रित करून इयत्ता ११ वीचे पुस्तक तयार केले आहे.

भारताची राष्ट्रीय सुरक्षितता समजून घेण्याच्या दृष्टीने तसेच त्याबाबत विश्लेषण करून मूल्यमापन करण्यासाठी लागणारा पाया ह्या पुस्तकाद्वारे तयार होणार आहे.

हे पुस्तक तुम्हांला तुमच्या करिअरचे नियोजन करण्यासाठी मदत करील. हे करिअर लष्करी सेवा, नागरी सेवा तसेच धोक्यांचे विश्लेषण (Risk analysis) ह्या विषयांत कार्य करणाऱ्या विचारगटांमध्ये (Think Tank) असू शकते.

# संरक्षणशास्त्रविषयक क्षमता : इयत्ता ११ वी


| क्षमता विधाने |
|---|
| (१) संरक्षणशास्त्रातील समस्या समजून घेण्यासाठी संकल्पनांच्या आधारे पाया तयार करणे. |
| (२) राष्ट्रीय हित आणि राष्ट्रीय संरक्षण यातील सहसंबंधांचे आकलन करणे. |
| (३) भूगोल आणि संरक्षण यातील सहसंबंध महत्वाचा आहे. हा सहसंबंध भू-राजनीतीसंदर्भात समजून घेणे. |
| (४) भारतीय संरक्षण धोरणावर पडणाऱ्या भौगोलिक वैशिष्ट्यांच्या प्रभावाचे विश्लेषण करणे. |
| (५) नकाशाच्या साहाय्याने भारतीय सीमांचा अभ्यास करणे. |
| (६) लष्करी इतिहास म्हणजे केवळ लढायांचा अभ्यास नव्हे हे समजून घेणे. |
| (७) प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील भारतीय लष्कराचा इतिहास समजून घेणे. |
| (८) लष्करी इतिहास आणि भू-राजनीती सहसंबंधांचे विश्लेषण करणे. |
| (९) राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी लागणारी किंमत किती असावी याबाबत संरक्षणाचे अर्थकारण समजून घेणे. भारतीय संरक्षण उद्योगांची माहिती समजून घेणे. |
| (१०) संरक्षण आणि विकासातील सहसंबंधांचे आकलन करणे. |
| (११) विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी यांतील संबंध समजून घेणे. |
| (१२) भारतातील तंत्रज्ञान विकासाचे स्वरूप समजून घेणे. भारताच्या संदर्भात अणुशक्ती, अवकाश आणि इलेक्ट्रॉनिक्स यांच्या विकासाचा अभ्यास करणे. |
| (१३) भविष्यकालीन तंत्रज्ञानाबाबत विचार करण्याची क्षमता विकसित करणे. |
| (१४) भारतीय संरक्षण मंत्रालय या संस्थेची ओळख करून घेणे. भारतातील उच्चस्तरीय संरक्षण संघटनांचा अभ्यास करणे. |
| (१५) भूदल, नौदल, वायुदल, आणि निमलष्करी दल यांची भूमिका समजून घेणे. |

**S.O.I. Note :**

The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2019. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | जगाचा नकाशा | |
| १. | संरक्षणशास्त्रातील महत्वाच्या संकल्पना | १ |
| २. | भू–राजनीती | १० |
| ३. | लष्करी इतिहास | १९ |
| ४. | संरक्षण अर्थशास्त्र | ३१ |
| ५. | विज्ञान, तंत्रज्ञान आणि भारताची राष्ट्रीय सुरक्षा | ४० |
| ६. | भारताची उच्चस्तरीय संरक्षण संघटना | ५४ |
| | परिशिष्ट : सशस्त्र सेनेतील करीअरच्या संधी | ६४ |


WORLD - POLITICAL (MAJOR COUNTRIES)
ARCTIC OCEAN
PACIFIC OCEAN
ATLANTIC OCEAN
INDIAN OCEAN
PACIFIC OCEAN
RUSSIA
ALASKA (USA)
CANADA
GREENLAND (DENMARK)
ICELAND
UNITED STATES OF AMERICA
MEXICO
CUBA
COSTA RICA
PANAMA
VENEZUELA
COLOMBIA
ECUADOR
PERU
BOLIVIA
BRAZIL
PARAGUAY
CHILE
ARGENTINA
URUGUAY
NORWAY
SWEDEN
FINLAND
UNITED KINGDOM
DENMARK
POLAND
BELARUS
GERMANY
UKRAINE
FRANCE
ROMANIA
ITALY
PORTUGAL
SPAIN
TURKEY
GREECE
SYRIA
MOROCCO
TUNISIA
WESTERN SAHARA
ALGERIA
LIBYA
EGYPT
MAURITANIA
SENEGAL
GUINEA
MALI
NIGER
CHAD
SUDAN
NIGERIA
ETHIOPIA
SOMALIA
GABON
CONGO
ZAIRE
KENYA
TANZANIA
ANGOLA
ZAMBIA
NAMIBIA
MOZAMBIQUE
MADAGASCAR
SOUTH AFRICA
IRAQ
IRAN
JORDAN
KUWAIT
SAUDI ARABIA
UNITED ARAB EMIRATES
YEMEN
OMAN
AFGHANISTAN
PAKISTAN
KAZAKHSTAN
MONGOLIA
CHINA
INDIA
SRI LANKA
MALDIVES
MYANMAR
THAILAND
VIETNAM
MALAYSIA
INDONESIA
PHILIPPINES
TAIWAN
JAPAN
PAPUA NEW GUINEA
AUSTRALIA
NEW ZEALAND
FIJI
ANTARCTICA
N
0
5000 km
Parallel True to Scale: 0°
Miller Cylindrical Projection
60°
30°N
0°
30°S
60°
150°
120°
90°
60°
30°W
0°
30°E
60°
90°
120°
150°